नियमीत दिवाणी दावा क्र. ०४/२०२०.
नि. क्र. २८

**प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एच. आर. गुप्ता यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु–**

८. वादी जे भाडे देत होता त्याच्या पावत्या मी त्याला देत नव्हते. वैनगंगा ग्रामीण बँकेमध्ये माझ्या खात्यात वादी भाड्याचे पैसे भरत होता. मी त्या बँकेतील माझ्या खात्याचे खाते उतारा न्यायालयात दाखल करू शकते. मला पैसे मिळाले नाही तर मी बँक ऑफ इंडीया येथे त्याबाबत तक्रार करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी मला रोख रक्कम देत होता व मी त्याला त्याची पावती देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा माझ्या बँक खात्यात देखील पैसे भरत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी भाड्यापेक्षा जास्त रक्कम त्याच्याकडून वसूल करून घेत होते. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा माझ्याकडे पावती मागत होता परंतु मी जाणूनबूजून त्याला पावती देत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला रक्कम रुपये २२०५०/– ईतके जास्तीचे पैसे दिलेले आहेत. वादी याने दिनांक ३०/०४/२०१९ रोजी पाठवलेली नोटीस मला मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादी याने मला एकुण रक्कम रुपये १,१२,०५०/– ईतकी रक्कम दिलेली होती. मी दिनांक ३०/०४/२०१९ रोजीच्या वादीच्या नोटीसला उत्तर पाठवले होते. मी त्याचे उत्तर वकीलांचे मार्फत दिले होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मी सन २०१९ मध्येच उत्तर दिलेले होते.

९. मी कैफीयत दाखल करीत असताना वादीचे नोटीसीला उत्तर दिलेले आहे असे माझे विधीज्ञांना सांगीतले होते किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मी ते उत्तर अभिलेखावर का दाखल केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रुपये २२०५०/– ईतकी रक्कम वादीने जादाची रक्कम दिली होती हे मला मान्य होते त्यामुळे मी त्याला उत्तर पाठविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रुपये २२०५०/– ईतकी रक्कम वादीने मला जादाची दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा मला कोणतीही रक्कम देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की,

माझ्या शपथपत्रातील संपुर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**स्वा/–**
**(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांकः– २७/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आमगांव.**